# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १६/०६/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कळमेश्वर** :— पो.स्टे. कळमेश्वर दिनांक १४/०१/२०२० चे १९.४३ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. २०/२०२० कलम ३५४ (अ) भादवी सहकलम ७, ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०९/०१/२० चे १७.४५ वा. दरम्यान १४ वर्षीय पिडीत/फिर्यादी मुलगी ही बसस्टाप वर उभी असतांना आरोपी नामे— अनिल नारायण वाघ, वय ४० वर्ष, रा. बोरगाव(धुरखेडा) याने फिर्यादीला माझे मोटरसायकल वर बस असे म्हणुन गाडीवर तिला बसवून घेतले व रस्त्यावर पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक १५/०१/२०२० चे २०.०० वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मपोउपनि अश्विनी बावचे, पो.स्टे. कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक १५/०६/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. त्रीवेदी, विशेष जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ७, ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/—रु. दंड व दंड न भरल्यास २ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती कल्पना पांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. शंकरराव तराळे, सुनिल डोंगरे, प्रमोद कडबे यांनी मदत केली आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर